MHAM140014412025

दि.कि.अ.क्र.२८२/२०२५
साहेबराव + ३ वि- निरंक

## निशाणी क्र.०१ खालील आदेश

**(दिनांक २३.०३.२०२६)**

०१. अर्जदारांनी सदरचा अर्ज हा मुंबई रेग्युलेशन नंबर VIII १८२७ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलला आहे.

०२. मयत रामलाल बाटू भिलावेकर यांचे अर्जदार क्र. १ ते ३ हे मूले आहे व अर्जदार क्र.४ ही पत्नी आहे. रामलाल बाटू भिलावेकर यांचा मृत्यु दि.०४/०९/२०२४ रोजी बेरदाबरडा, ता. धारणी, जि.अमरावती येथे झालेला आहे. मयत रामलाल बाटू भिलावेकर यांचे अर्जदार हे वारस आहे. अर्जदारांना कार्यालयीन व वैयक्तीक कामाकरीता वारस दाखल्याची आवश्यकता आहे.

०३. अर्ज दाखल केल्यानंतर जाहिर प्रगटन व सायटेशन नोटीसचा आदेश करण्यात आला. त्याप्रमाणे "दै.विदर्भ की दहाड" या दैनिकामध्ये दि.०६/०२/२०२६ रोजी नि.क्र.१५ प्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात आले. जाहिरनामा निशाणी क्र.९ हा ग्रा.पं. बेरदाबरडा, तहसिल कार्यालय धारणी व न्यायालयाचे सुचना फलकावर अडकवण्यात आला, आजपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही.

०४. अर्जदारांनी दाखल केलेला अर्ज कागदपत्रे व साक्षीपुरावा पाहिला. अर्जदारांनी सदरचा अर्ज हा मुंबई रेग्युलेशन नंबर VIII १८२७ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांनी निशाणी क्र.०८ प्रमाणे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केलेले आहे. शपथपत्रामध्ये साक्षिदाराने मुळ अर्जा प्रमाणे कथन केलेले आहे. अर्जदारांनी निशाणी क्र. १० वर रामलाल बाटू भिलावेकर यांचा मृत्युचा दाखला दाखल केलेला आहे. नि.क्र.११ ते १४ वर अर्जदारांचे आधारकार्डाची सत्यप्रती जोडली आहे.

०५. निशाणी क्र १० वरील रामलाल बाटू भिलावेकर यांचे मृत्युप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यांचा मृत्यु दि.०४/०९/२०२४ रोजी बेरदाबरडा, ता. धारणी, जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदारांचा पुरावा हा आव्हानीत केलेला नाही. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यानंतर आजपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही. अर्जदारांच्या वतीने दिलेला

तोंडी व कागदोपत्री पुरावा विचारात घेता, अर्जदार हे रामलाल बाटू भिलावेकर यांचे वर्ग १ चे कायदेशिर वारस आहे, असे औपचारीकरित्या जाहिर करुन वारस प्रमाणपत्र देण्यात येणे योग्य व न्यायोचित आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत रामलाल बाटू भिलावेकर यांना अर्जदार क्र.१ साहेबराव रामलाल भिलावेकर (मुलगा), अर्जदार क्र.२ रमेश रामलाल भिलावेकर (मुलगा), अर्जदार क्र. ३ रघुनाथ रामलाल भिलावेकर (मुलगा) व अर्जदार क्र. ४ मैनी रामलाल भिलावेकर (पत्नी) हे औपचारीकरित्या कायदेशिर वारस असलेबाबत प्रमाणपत्र आवश्यक ती कोर्ट फि घेवून अर्जदारास देण्यात यावे.

३. अर्जदारांना असेही आदेशीत करण्यात येते की, त्यांनी वारस दाखल्याच्या आधारे त्यांना मिळणा-या मयतांच्या नावावर असलेल्या सर्व स्थावर आणि जंगम मिळकतीचा (immovable and movable properties) सविस्तर खुलासा या न्यायालयात सादर करावा व मयताकडुन प्राप्त झालेल्या सर्व मिळकतीचे सविस्तर वर्णन वारस दाखला मिळाले पासुन या न्यायालयात सहा महिन्यात दाखल करावे. तसेच, त्यांनी कोणत्या मिळकतींची विल्हेवाट लावली असल्यास त्यास खुलासा एक वर्षात सादर करावा, तसे न केल्यास अर्जदार हे भारतीय वारसाहक्क कायदा XXXIX, १९२५ चे कलम ३१७ व ३९० नुसार भारतीय दंड विधान कलम – १७६ अन्वये दंडास पात्र ठरतील.

अर्जदाराने दिवाणी मॅन्युअल परिच्छेद ३१२ प्रमाणे पुर्तता करावी.

ADITYA AJAY CHAVAN
Digitally signed by ADITYA AJAY CHAVAN
Date: 2026.03.23 17:23:17 +0530

**( ए. ए. चव्हाण )**
**सह दिवाणी न्यायधिश, क.स्तर,**
**धारणी**

**दि. २३/०३/२०२६**

Certificate

I affirmed that, the contents of this PDF file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. A. K. Pawar, |
| Court Name | : | Shri. A. A. Chavan<br>Jt. C.J.J.D., Dharni. |
| Order signed by P.O. | : | 23.03.2026. |
| Order uploaded on | : | 23.03.2026. |